# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**३५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०६.२०२४**

जिल्हा : अहमदनगर

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०६/२०२४ ते २७/०६/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०६/२०२४ ते ०३/०७/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ |
| ०.० | ०.० | ५.२ | २२.८ | ०.० | ०.० | ७.० | पाऊस (मिमी) | १९ | १५ | १० | ११ | १२ |
| ३२.४ | ३४.६ | ३५.६ | ३३.० | ३२.० | ३१.० | ३०.० | कमाल तापमान (अंसे) | ३० | ३० | ३२ | ३३ | ३१ |
| २५.७ | २४.१ | २५.१ | २४.३ | २४.७ | २४.९ | २३.९ | किमान तापमान (अंसे) | २३ | २३ | २२ | २२ | २२ |
| २.० | ०.० | २.० | १.० | ०.० | ०.० | १.० | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ७७ | ७६ | ८६ | ८४ | ८० | ७८ | ८० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८६ | ८३ | ८२ | ८१ | ८१ |
| ४४ | ३९ | ५४ | ६० | ६३ | ७३ | ६० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ७६ | ७३ | ७६ | ७२ |
| ६.२ | ४.८ | २.३ | १.३ | १.२ | १.८ | १.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | २० | २३ | २७ | ३० | ३२ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशता ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. विजेच्या पूर्वानामाकरीता दामिणी ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **खरीप पिकाची पेरणी पूर्ण करून घ्यावी.** |
| ऊस | | मान्सूनपूर्व पावसानंतर सायंकाळच्या वेळी शेताच्या आजूबाजूला असलेल्या कडुनिंब, बाभूळ, बोर या यजमान झाडांना हालावून खाली पडलेले भुंगे सामुदायिकरित्या गोळा करणे आणि रॉकेलच्या पाण्यात टाकून मारणे.<br>रस्त्याच्या कडेला आणि प्रादुर्भावग्रस्त शेताच्या आजूबाजूला आढळणाऱ्या यजमान झाडांच्या खाली पाण्याचे प्रकाश सापळे लावावेत. सुमारे अर्धा फूट खोलु, १ मीटर रुंद आणि १.५ मीटर लांब खंदक बनवा आणि पाणी आत साचण्यासाठी तळ आणि बाजू प्लास्टिकच्या कागदाने झाकून टाका. त्यावर ४० ते १०० वॅटचा बल्ब किंवा ५ ते १० वॅटचा CFL बल्ब सायंकाळी ७ ते रात्री ९ च्या दरम्यान चालू ठेवावा. भुंगे या प्रकाशाकडे आकर्षित होऊन पाण्यात पडतात आणि मरतात. प्लास्टिकची घमेली किंवा टफचा वापर करून सुद्धा पाण्याचे प्रकाश सापळे बनवता येतात.<br>हुमणी भुंगेर्यांना आश्रय देणाऱ्या यजमान झाडांवर सायंकाळी क्लोरोपायरीफॉस २० ईसी @ २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | पेरणी | **पेरणीचे अंतर:** ५×४५ सेंमी<br>**खत मात्रा:** चांगले कुजलेले शेण खत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी १२ ते १५ टन वापरावे. सोयाबीन पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ७५ किलो स्फुरद आणि ४५ किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. खते पेरणीपुर्वी जमिनीत मिसळून द्यावीत अथवा दोन चाड्याच्या पाभरीने खते व बियाणे एकाचवेळी पेरून द्यावे. |
| तूर | पेरणी | **पेरणीचे अंतर:** ६० x २० सेंमी किंवा ९० × २० सेंमी<br>**खत मात्रा:** सलग तुरीसाठी हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद म्हणजेच १२५ किलो डीएपी पेरणीचे वेळी द्यावे. पीक ५०% फुलोऱ्यात असतांना मल्टीन्युट्रीयन्टची फवारणी करावी. आंतरपिक असल्यास ज्या पिकाच्या ओळी जास्त त्या मुख्य पिकाची शिफारस केलेली खत मात्रा द्यावी. उदा. सोयाबीन करीता ५० किलो नत्र आणि ७५ किलो स्फुरद अशी मात्रा द्यावी. |
| मूग | पेरणी | **पेरणीचे अंतर:** ३०×१० सेंमी<br>**खत मात्रा:** २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद म्हणजेच १०० किलो डीएपी प्रति हेक्टरी द्यावे. शक्यतो रासायनिक खते ही चांगल्या कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून बियाणालगत पेरुन द्यावी म्हणजे त्याचा प्रभाव चांगला होतो. |
| उडीद | पेरणी | **पेरणीचे अंतर:** ३०×१० सेंमी<br>**खत मात्रा:** २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद म्हणजेच १०० किलो डीएपी प्रति हेक्टरी द्यावे. शक्यतो रासायनिक खते ही चांगल्या कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून बियाणालगत पेरुन द्यावी म्हणजे त्याचा प्रभाव चांगला होतो. |
| कापूस | पेरणी | **पेरणीचे अंतर:** बी.टी. कापूस कोरडवाहू लागवड – १२० × ४५ सेंमी (४ × १.५ फूट)<br>बी.टी. कापूस बागायती लागवड – १५० × ३० सेंमी (५ × १ फूट) किंवा १८० × ३० सेंमी (६ × १ फूट)<br>**खत मात्रा:** संकरित कापसासाठी प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश, तर सुधारित |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | वाणांसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाशची मात्रा आवश्यक असते. तसेच जमिनीचा पोत सुधारण्यासाठी प्रति हेक्टरी २५ गाड्या शेणखत शेवटच्या कुळवाच्या पाळी अगोदर द्यावे. |
| **मका** | **पेरणी** | **पेरणीचे अंतर:** उशिरा व मध्यम वाणांसाठी ७५ x २० सेंमी<br>लवकर पक्व होणाऱ्या वाणांसाठी ६० x २० सेंमी<br>**खत मात्रा:** पेरणीच्या वेळेस ३५ किलो युरिया, १५० किलो स्फुरद आणि २८ किलो पालाश प्रति एकरी द्यावे. |
| **सूर्यफूल** | **पेरणी** | **पेरणीचे अंतर:** मध्यम ते खोल जमिनीत व सुधारीत वाणांसाठी ४५ × ३० सेंमी<br>संकरित व जास्त कालावधीच्या वाणांसाठी ६० × ३० सेंमी<br>**खत मात्रा:** कोरडवाहू पिकास प्रति हेक्टरी २.५ टन शेणखत तसेच ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश पेरणीच्या वेळेस दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावे. बागायती पिकास प्रति हेक्टरी ६० किलो नत्र + ६० किलो स्फूरद + ६० किलो पालाश द्यावे. यापैकी ३० किलो नत्र व संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेल्या ३० किलो नत्राची मात्रा पेरणीनंतर एक महिन्याच्या आत द्यावी. गंधकाची कमतरता असलेल्या जमिनीसाठी प्रति हेक्टरी २० किलो गंधक पेरणीच्या वेळी गांडूळ खतात मिसळून द्यावे. |
| **बाजरी** | **पेरणी** | **पेरणीचे अंतर:** दोन ओळीतील अंतर ३० सेमी ठेवावे.<br>**खत मात्रा:** ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद आणि ३० किलो पालाश प्रति हेक्टरी पेरणीच्या वेळी द्यावे. |
| **भुईमुग** | **पेरणी** | **पेरणीचे अंतर:** ३०×१० सेंमी<br>**खत मात्रा:** प्रति हेक्टरी १० टन कंपोस्ट किंवा चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. पेरणीच्या वेळेस २५ किलो नत्र + ५० किलो स्फुरद द्यावे. भुईमूगाच्या अधिक उत्पादनासाठी रासायनिक खत मात्रे सोबत जिप्सम ४०० कि/हे (२०० कि/हे पेरणीवेळी तर उर्वरीत २०० कि/हे आऱ्या सुटतांना) जमिनीत मिसळुन द्यावे. |

**स्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २८.०६.२०२४

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**